Volume - 4 (2023)
Special Issue - 2 (April)
**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# भारतीय राज्यघटना व मानवाधिकार

**प्रा. डॉ. संजय एम. अवधुत**
डॉ. पंजाबराव देशमुख कला व वाणिज्य
(सायम) महाविद्यालय,कॉटन मार्केट, नागपुर

---

**प्रस्तावना —**

भारतीय राज्यघटनेत नमूद असणारे सहा मूलभूत अधिकार हे भारतीय नागरीकांना देण्यात आलेले मानवाधिकार आहेत. भारतीय घटना निर्मात्यांनी भारतातील सामाजिक परिस्थितीचा सखोल अभ्यास करुन, सर्व नागरीकांना न्याय मिळेल सर्वांना प्रतीष्ठेने जिवन जगता येईल या दृष्टीकोनातून राज्यघटनेत योग्य त्या सर्व तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. मानवाधिकार ही संकल्पना अत्यंत व्यापक आहेत. युनोच्या चार्टर मध्ये ३० मानवाधिकाराचा उल्लेख करण्यात आलेला आहे. या सर्व अधिकारांपैकी अंतर्गत राजकीय व सामाजिक परिस्थितीशी मेळ घालवून जास्तीत जास्त अधिकार आपल्या नागरिकांना देण्याचा प्रयत्न राज्य करीत असते. भारताच्या संदर्भात या दृष्टीने कार्य परिस्थित आहे. याचा आढावा प्रस्तुत शोध निबंधात घेण्यात येत आहे.

**१) मानवाधिकार संकल्पना —**

मनुष्य या सृष्टीतील सर्वोच्च सृजन आहे, मनुष्याचा विकास म्हणजे या सृष्टी चा विकास होय. आदिकाळापासुन तर वर्तमानकाळापर्यत मनुष्य विकासाच्या अनेक टप्प्यातुन प्रवास करीत आहे. मनुष्य कधी गुलामगिरीच्या पाशात अडकला तर कधी पशुवत जिवन जगला तर कधी विद्रोही भुमीका घेतली व क्रांतीदुत च्या स्वरूपात पुर्ण समाजाला आंदोलीत केले तर काही वेळेस विवेकपुर्ण चिंतनशील घटक म्हणुन स्वत:चे व समाजबांधवाचे भविष्य सुधारण्याकरीता शासन व्यवस्थेला आग्रह सामंजस्य तर कधी संघर्ष करतांना दिसुन येतो. केवळ मनुष्यच असा आहे की ज्याला नेहमीच समाजाची आवश्यकता राहीली आहे, याच समाजात तो स्वत: व पुर्ण समाजाच्या विकासाचे प्रयत्न करू शकतो. प्रत्येक मनुष्यात अनेक क्षमता, प्रतिभा च शक्यता विद्यमान असते व त्यांच्या विकासाकरीता त्याला अनुकुल परिस्थीती आणि योग्य संधीची आवश्यकता असते. प्रसिध्द राजकीय विचारवंत टी. एच. ग्रीन म्हणतो. 'मानवी चेतना स्वत:चा विकास करू इच्छिते, चेतनेसाठी स्वातंत्र्य आवश्यक आहे व स्वातंत्र्यासाठी अधिकार आवश्यक आहे.'

मनवी सभ्यतेच्या इतीहास इतकाच मानवाविकाराचा इतीहास प्राचीन आहे. आदि मानवापासुन तर आजच्या मानवाने स्वत:च्ये स्वार्थ व हिताकरीता अन्य प्राण्यांच्या अधिकारांचे हनन एक निर्वीवाद व निरंतर सत्य राहीले आहे.

मानवाधिकाराच्या संकल्पनेचा अर्थ असा की समाजातील प्रत्येक सदस्याला मानवियतेमुळे काही मुलभुत अधिकार त्याला असतात हे असे अधिकार आहे ज्याची मागणी प्रत्येक व्यक्ती द्वारे केली जावु शकते, हे कायदेशीर किंवा राष्ट्रीय नसुन सर्वव्यापी अधिकार आहे. जे प्रत्येक राज्यात कोणत्याही परिस्थीतीत लोकांना मिळायलाच हवे हे राज्य किंवा समाजाची देणगी नसुन स्वत: व्यक्तीमध्येच अंतर्भुत आहेत. तात्वीक दृष्टीकोनातुन पाहील्यास हे अधिकार सातव्या शतकात विकसीत नैसर्गिक अधिकाराच्या धारनेने प्रेरीत आहे. परंतु विसाव्या शतकात यालाच मानवाधिकार संबोधण्यात आले. कारण यांना आज मनुष्याच्या बुध्दीमत्तेवर आधारीत न मानता मनुष्याच्या गरजेवर आधारीत मानण्यात येते.

मानवाधिकार संकल्पना विकसनशील आहे. याचा निरंतर विकास होत आहे. मानवाधिकार तिन पिढीत वर्गीकरण केले जावु शकते. मुळ स्वरूपात मानवाधिकार म्हणजे असे नागरीक व

राजकीय स्वातंत्र्य होते की ज्यामध्ये राज्याने हस्तक्षेप न करने हे राज्याचे कर्तव्य मानण्यात आले होते. ही मानवाधिकारीची प्रथम पिढी होती. क्रमश: असे अनुभवास आले की आर्थिक, सामाजिक व सांस्कृतीक अधिकाराच्या हमी शिवाय नागरीक व राजकीय अधिकारांचा उपयोग शक्य नाही. मनुष्याला सामाजिक, आर्थिक व संस्कृतीक अधिकार प्राप्त झाले पाहीजे असे कार्यक्रम व योजना लागु करणे हे राज्याचे कर्तव्य मानण्यात आले. ही मानवाधिकाराची दुसरी पिढी आहे. विकासाच्या वर्तमान टप्प्यात समुह मानवाधिकाराची संकल्पना विकसीत झाली. आता केवळ मनुष्यच नाही तर मानवी समुहाच्या मानवाधिकाराची स्थापना होत आहे. उदा. आत्मनिर्णयाचा अधिकार शुध्द पर्यावरणाचा अधिकार, भिन्न मानव समुह, महीला, बालक, वृध्दजन, अपंग, जातीजमाती, इत्यादीच्या संरक्षणाचे अधिकार, नैसर्गिक आपत्ती सहायता चा अधिकार इ. मानवाधिकाराची तिसरी पिढी आहे.

आधुनिक इतीहासकार असे मानतात की मानवाधिकार ही संकल्पना १२१५ मधील मॅग्नाकार्टा पासुन उदभ्वलेली आहे. इंग्लंडमधील १२१५ मधील मॅग्नाकार्टा चा मानवाधिकार व स्वातंत्र्याच्या इतीहासात पाश्चिमात्य देशात उल्लेखनीय स्थान आहे. जॉन राजाने लोंकाचे शोषण केल्याच्या विरोधात सामंतांनी केलेल्या आंदोलनामुळे अगतीक होवुन 'मॅग्नाकार्टा लिबर्टेटुम ' ( स्वातंत्र्याचे महान चार्टर ) जाहीर केले होते. याच क्रमात १६२८चा 'पिटीशन ऑफ राईटस' आणि १६८९ मधील बिल ऑफ राईटस मानवांधिकारांच्या इतीहासात उल्लेखनीय आहेत. अमेरीकेतील १७९१ मधील 'बिल ऑफ राईटस ' व फ्रांस मधील १७८९ चा 'डिक्लेरेशन ऑफ राईटस ' चे सुध्दा ऐतीहासीक महत्व आहे. रशियातील १९१७ मधील 'बोल्शेविक क्रांती' हुकुमशाहीच्या विरोधातील मानवधिकाराचाच संघर्ष होता.

संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेसोबत मानवाधिकाराच्या क्षेत्रात क्रांतीकारी युगाचा प्रारंभ झाला. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेतील उदेदे्शिका, ध्येय व संरचने मध्ये मानवधिकाराप्रती आदर व संवर्धनाच्या यशस्वीतेसाठी करण्यात येणा—या उपाययोजना करीता व्यापक प्रमाणात तरतुद करण्यात आलेले आहेत. यादृष्टीने १० डिसेंबर १९४८ ला संयुक्त मानवधिकाराच्या घोषणे ला विशेष महत्व आहे. या घोषणेतील अधिकार जगातील संपुर्ण राष्ट्राकरीता सामान्य मानक आहे. या घोषणेनंतर आंतरराष्ट्रीय नागरीक व राजकीय अधिकार सनद, आंतरराष्ट्रीय, आर्थिक, सामाजीक आणि सांस्कृतीक अधिकार सनद आणि नागरीक व राजकीय अधिकारावर वैकल्पीक प्रोटोकॉल स्विकृत करण्यात आले आहे. हा दस्तावेज 'मानवाधिकाराचे आंतरराष्ट्रीय प्रतिज्ञापत्र ' म्हटले जाते. हे मानवाधिकारांच्या वृध्दी व पालन करण्याकरीता संयुक्त राष्ट्र संघाचे प्रगतीशील पाउल आहे.

मानवधिकाराच्या वरील दस्तावेजा शिवाय पुष्कला संमंती, प्रस्ताव इत्यादी आहेत. जे मानवाधिकाराच्या वाढलेल्या क्षेत्राविषयी आहेत. मानवाधिकार वरील अतिक्रमण रोखण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर उपाययोजना करण्यात आलेले आहेत. उदा. मानवाधिकार परिषद, संयुक्त राष्ट्र मानवाधिकार उच्चायुक्त पद, मानवाधिकार केंद्र इ. काही क्षेत्रीय प्राधिकरण आहेत ज्याद्वारे मानवाधिकाराचे संरक्षण सुरक्षित करण्याचे कार्य होत असते. आंतरराष्ट्रीय व क्षेत्रीय स्तरावर अनेक गैर शासकीय संस्था सुध्दा या क्षेत्रात कार्य कारीत आहे. उदा. आंतरराष्ट्रीय रेड क्रास समीती, एमनेस्टी इंटरनॅशनल लॉ कमिशनल ऑफ जुरीस्ट इत्यादी. या प्रकारे आंतरराष्ट्रीय स्तरावर मानवाधिकाराच्या सुरक्षेकरीता मोठया प्रमाणावर प्रयत्न करण्यात आलेले आहेत व करण्यात येत आहे.

**२) भारतीय राज्यघटनेतील अधिकार —**

भारतीय राज्यघटनेत नागरीकांना देण्यात आलेले अधिकार हे मानवाधिकाराच्या परिभाषेत बसतात काय हे पडताळून पाहण्यासाठी भारतीय राज्यघटनेतील अधिकारांचा संक्षिप्त आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. खालीलप्रमाणे सहा अधिकार मूलभूत अधिकार म्हणून भारतीय राज्यघटनेने भारतीय

नागरीकांना प्रदान केलेले आहे.

**अ) समानतेचा अधिकार** — भारतीय राज्यघटनेचा कलम क्रं. १४ ते १८ मध्ये समानतेच्या अधिकाराचे वर्णन करण्यात आलेले आहे. कलम १४ नुसार कायद्या समोर समानता, कायद्यापुढे सर्व व्यक्ती समान असतील व कायद्याचे सर्व व्यक्तींना समान संरक्षण मिळेल. कोणत्याही आधारे कोणत्याही व्यक्ती प्रती भेदभाव केला जाणार नाही. कलम १५ नुसार समाजात वावरतांना सार्वजनीक ठिकानी कोणत्याही व्यक्ती प्रती भेदभाव केला जाणार नाही. सर्वांच्या प्रती समानतेची वागणूक देण्यात येईल. कलम १६ नुसार सर्व नागरीकांना राज्याअंतर्गत असणा—या सेवेत पदप्राप्त करण्याकरीता समान संधी देण्यात येईल. परंतु मागासलेल्या जागी जमाती साठी काही जागा आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत. या जागांवर त्याच जाती जमातीच्या सर्व नागरीकांना समान संधी देण्यात येईल. कलम १७ नुसार समाजात प्राचीन काळापासून सुरु असणारी अस्पृष्यता नष्ट करण्यात आलेली असून अस्पृष्यता पाळणे हा कायदेशीर गुन्हा ठरविण्यात आलेला आहे. अस्पृष्यता पाळणे ही समानतेशी विसंगत असल्यामुळे समाजातुन अस्पृष्यतेचे उच्चाटन करण्याकरीता १९५५ मध्ये संसदेने अस्पृष्यता निवारण कायदा करण्यात आला. कलम १८ नुसार ब्रिटिश काळात शासन आपल्या मर्जितील लोकांना रावबहादूर, दिवाण महाजन इ. अशा प्रकारच्या पदव्या देऊन त्यांचा सत्कार करीत असत व अशा लोकांना समाजात विशेष महत्व प्राप्त होत असे हे समानतेशी विसंगत असत्यामुळे अशा पदत्यांची समाप्ती करण्यात आलेली आहे. विशेष गुण व कार्याच्या आधारावर पदवी दिली जाते. उदा. पद्मवीभूषन, भारत रत्न, शौर्य पूरस्कार इ. या पदत्यामुळे समानतेच्या तत्वाला धक्का लागत नाही. या पदत्यामुळे समाजातील लोकांना आपली, क्षमता व कौशल्य वाढवून विशेष उल्लेखनीय कार्य करण्याची प्रेरणा मिळते.

**ब) स्वातंन्र्याचा अधिकार** — कलम १९ ते २२ मध्ये स्वातंन्र्याच्या अधिकाराच्या उल्लेख करण्यात आलेला आहे. कलम १९ नुसार भारतातील प्रत्येक व्यक्तीला भाषा आणि विचार स्वातंन्र्य, देशात कोणत्याही भागात, संचार, वास्तव्य व व्यवसाय करण्याचे स्वातंन्र्य प्रदान करण्यात आलेले आहे. कलम २० नुसार अपराधी व्यक्तीला निर्दोषत्व सिध्द करण्याचे स्वातंन्र्य देण्यात आलेले आहे. कलम २१ नुसार स्वत:च्या जिवांचे रक्षण करण्याचे स्वातंन्र्य व कलम २२ नुसार बेकायदेशीर अटक झाली असल्यास संरक्षण मिळविण्याचा अधिकार घटनेने दिलेला आहे.

**क) शोषणांविरुध्दचा अधिकार** — कलम २३ व २४ नुसार शोषणाविरुध्दचा अधिकार देण्यात आलेला आहे. भारतात पूर्वीपासून वेठबिगारी, देवदासी पध्दती अस्तित्वात होत्या. मजूरांवर जमीनदारांचे नियत्रण होते, मागासवर्गीय स्त्रियांचे शोषण होत होते. अशा प्रकारचे शोषण व कलम २४ नुसार १४ वर्षाखालील मुलांना मजूरी करण्यावर प्रतिबंध घालून बालमजूरी संपूष्टात आणण्यात आलेली आहे. शारीरीक व बौध्दीक विकसनशील वयात (Growing Age) एखादया बालकावर केवळ उदरनिर्वाहाकरीता त्याच्यावर काम व मजूरी करण्याची वेळ यावी हे अमानणीय व राष्ट्रीय प्रतिष्ठेसाठी लाजीरवाणी व क्लेशदायक बाब आहे. यावर शासनाने बंदी घातलेली असून अशा गरजू बालकांना सहाय्य करने हे राज्याचे तव्दतच समाजाचे कर्तव्य आहे.

**ड) धार्मिक स्वातंन्र्याचा अधिकार** — कलम २५ ते २८ मध्ये धार्मिक स्वातंन्र्याच्या अधिकाराचे वर्णन आहे. कलम २५ नुसार भारतीय नागरीकांना आपल्या इच्छेनुसार कोणत्याही धर्माचा स्विकार करण्याचा, कलम २६ नुसार प्रत्येक धर्मियांना धार्मिक संस्था स्थापन करण्यांचा, धर्माचा प्रचार व प्रसार करण्याचा अधिकार आहे. कलम २७ नुसार धार्मिक कार्यासाठी निधि गोळा करतांना विशिष्ट धर्माच्या कार्याकडे जाणा—या निधिसाठी कर देण्याची सक्ती कोणावरही करता येणार नाही. कलम २८ नुसार धार्मिक शिक्षण देण्यावर बंदी घालण्यात आली आहे. शासकीय संस्थांमधून व शासकीय मदतीवर चालणा—या संस्थांमधून धार्मिक शिक्षण देता येणार नाही.

**इ) संस्कृती व शिक्षण विषयक अधिकार** — कलम २९ व ३० मध्ये संस्कृती विषयक

अधिकारांचे वर्णन करण्यात आलेले आहे. कलम २९ नुसार प्रत्येक नागरिकाला व समुदायाला आपली भाषा, लिपी व संस्कृती जोपासण्याचा अधिकार आहे. कलम ३० नुसार अल्पसंख्याक समुदायाला आपल्या पसंतीनुसार धर्म व भाषेच्या आधारावर शिक्षण संस्था स्थापन करण्याचा व तो चालविण्याचा अधिकार राहील. राष्ट्रविरोधी व आपत्तीजनक शिक्षण यातुन देता येणार नाही.

**फ) घटनात्मक उपायांचा अधिकार —** कलम क्र.३२ नुसार प्रत्येक नागरीकाला मिळालेल्या अधिकारावर आक्रमण व अधिकाराचा संकोच झाल्यास अधिकाराचे संरक्षण करण्याची तरतुद यात वर्णन करण्यात आलेली असुन यानुसार प्रत्येक नागरीकाला अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी बंदी प्रत्यक्षीकरण, परमादेश अधिकार पृच्छा, प्रतिषेध व उत्प्रेक्षन या पाच प्रकारच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. या विविध अर्जाच्या माध्यमातुन नागरीक स्वत:ला न्याय व बेकायदेशीर अटकेपासुन संरक्षण प्राप्त करू शकतो.

वरील सहा प्रकारचे मुलभुत अधिकार नागरीकांना प्रदान करून भारतीय संविधानाद्वारे मानवाधिकाराचे जतन करण्यात आलेले आहे. मानवाधिकारात अपेक्षित असणारे साधारणत: सर्वच अधिकारांचा समावेश या भारतीय राज्यघटनेतील मुलभुत अधिकारामध्ये झालेला आहे.

**३) मानवाधिकारातील अडथळे —**

मानवाधिकाराबाबत भारतीय संविधानात असणाऱ्या तरतुदींचा सविस्तर आढावा घेतल्यानंतर प्रत्यक्ष समाजात मानवाधिकाराच्या बाबतीत काहीच तक्रार नाही किंवा काहीच समस्या नाहीत असे नाही. मानवाधिकाराच्या बाबत निश्चीतपणे काही समस्या दिसुन येतात त्याचे विश्लेषण खालील प्रमाणे दर्शविता येईल.

**अ) धर्मातील कट्टरवादीता व संकुचीत भावना —**

भारत हा विभिन्नतेने नटलेला देश आहे. इथे विभिन्न भाषा, धर्म, पंथ, संस्कृती चे लोक राहतात. स्वातंत्र्यानंतर भारतात धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाचा याकरीता अंगीकार करण्यात आला की सर्व धर्मियांना सुरक्षीतपने जिवन जगता येइल व सौहार्दपुर्ण संबंध टिकुन राहील. अल्पसंख्याकां करीता विशेष सवलती देण्यात आल्या. याशिवाय विभीन्न प्रकारच्या संस्थेत व शासकीय नौकरीत जागा आरक्षित ठेवण्यात आल्या. यांनंतरही सौहार्दपुर्ण व धर्मनिरपेक्ष समाज स्थापन झालेला नाही. धार्मिक कट्टरवादी समुहामध्ये अजुनही परिपक्वता नसुन शाहीनबाग, पश्चिम बंगाल मधील हिंसा अशा प्रकारच्या घटना अधुन मधुन घडत असतांना दिसतात.

**ब) सामाजीक अडथळे —**

भारतीय समाजात अनेक परंपरागत कुप्रथा आहेत. जातीप्रथा, रूढी रितीरिवाज, स्त्री पुरूष भेदभाव या बाबी असमानता व शोषनावर आधारीत आहेत. मानवाधिकार संकल्पना स्वतंत्रता, समानता व न्यायावर आधारीत आहे. महीलांची सामाजीक स्थिती समानतेशी विसंगत आहे. आजही अनेक ठिकानी स्त्रीयांच्या मताला महत्व दिल्या जात नाही. भिन्नवर्गातील स्त्री पुरूषांचे शोषण केले जाते. त्यांच्याकडुन अंगमेहनतीचे काम करून घेतले जाते व योग्य मोबदला दिला जात नाही व त्यांच्या आरोग्याचाही विचार होत नाही.

**क) आर्थिक अडथळे —**

भारतीय समाजातील या असमानता व मागासलेपनामुळे आर्थीक असमानता निर्मान झालेली आहे. बालमजुरी, वेठबिगारी हे यांचे ज्वलंत उदाहरण. बालमजुरी तर राष्ट्रावर काळा डाग असल्यासारखा आहे. बालक व लहान मुले कोणत्याही राष्ट्राचे भविष्य असतात समाजातील असहाय्य घटकां द्वारे त्यांना शिक्षण प्राप्त करण्यासाठी शाळेत न पाठवता पैसे कमविण्याकरीता कामावर पाठविण्यात येते. बिडी कारखाना, माचीस कारखाना, ग्लास कारखाना, उपहारगृहामध्ये कपबशा धुण्याकरीता, पाणि भरण्याकरीता अशा अनेक ठिकानी बालकामगार काम करतांना दिसतात. अशा परिस्थीतीत जिवन जगतांना त्यांच्या आरोग्यावर दुष्परीणाम होतो. ही बाब

अमानवीय आहे.

**४) उपाय योजना —** मानवाधिकार प्राप्तीच्या मार्गातील अडचणी विचारात घेता त्या दुर कशा करता येइल हे पाहणे अत्यंत महत्वाचे आहे. या संदर्भात खालील उपाययोजना सुचविता येईल.

१) मानवाधिकारासंबंधी जनजागृती व्हायला हवे ज्यामुळे मानवाधिकाराचे उल्लंघन झाल्यास त्या विरोधात आवाज उठविला जावु शकेल.

२) माध्यमे यांना लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हटले जाते जे यासंदर्भात मध्यवर्ती भुमिका घेवु शकतात. माध्यमे आपले लेख , कार्यक्रम व कार्यकर्त्यांच्या माध्यमातुन मानवाधिकार यासंबंधी लोकांना माहीती देवु शकतात व उल्लंघनाच्या काही घटना घडल्यास ते प्रकाशात आनुन त्यावर उपाय योजना करण्यासाठी सरकारने आवश्यक पावले उचलण्याकरीता शासनास भाग पाडले जावु शकते.

३) शिर्षस्थानी बसलेल्या राजकीय नेत्यांना आपल्या भुमीकेत सुधारणा करावी लागेल. त्यांनी मतांच्या राजकारणाचा त्याग करून मानवाधिकाराच्या सुरक्षेकरीता आवश्यक कायदे बनविण्यासह प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची व्यवस्था करावी लागेल.

४) पोलीस प्रशासनास जास्तीत जास्त जनमित्र बनवावे लागेल. याकरीता त्यांना प्रशिक्षणाद्वारे संवेदनशील बनविण्याचा प्रयत्न करावा लागेल. समाजातील अनुचीत घटनांकडे मानविय दृष्टीकोनातुन संवेदनशिलपने पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोन तयार करावा लागेल.

**निष्कर्श —** याप्रमाणे प्रशासकीय व्यवस्थेत जास्तीत जास्त सुधारणा करून शिस्तप्रीयता, भ्रष्टाचाराचे निर्मुलन, संवेदनशिलता, त्याग, परोपकाराची भावना या सर्व गोष्टीची भर घातल्यास ख—या अर्थाने, सौजन्यशील, सदभावनापुर्ण व सौदार्ह वातावरन समाजव्यवस्थेत निर्माण होईल व ख—या अर्थाने सर्वकश क्षेत्रात मानवाधिकाराची मुहुर्तमेढ रोवल्या जाईल असे संशोधकाचे निष्कर्श आहे.

**संदर्भ —**

- राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, नवी दिल्ली, वार्षिक अंक
- भारतीय राज्यव्यवस्था, भा. ल. भोळे, पिंपळापुरे प्रकाशन
- भारतीय शासन व राजकारण, डॉ. जोगेद्र गवई व शेख हशम, युनिव्हर्सल प्रकाशन, नागपुर
- भारतीय संविधान, शासन प्रत
- India Today Magazine
- भारतीय राजनिती विज्ञान शोध पत्रीका
- वृत्तपत्र अवलोकन — तरूण भारत, लोकसत्ता, लोकमत, हितवाद, महाराष्ट्र टाइम्स